33 ~~28~~

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम, १९६१
राज्य शासकिय अधिका-यांना वैद्यकिय तपासणी सुविधा.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक एमएजी १०९८/ प्र.क्र.२२०/आरोग्य-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १ डिसेंबर, १९९८

शासन निर्णय:- वाढते वय व जबाबदा-या, यामुळे निर्माण होणा-या मानसिक तणावांमुळे, विविध विकारांना वाव मिळत असतो. या विकारांवर प्राथमिक अवस्थेत प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यास, कालांतराने त्याचा विपरित परीणाम होऊन त्यावर अतिखर्चिक उपाययोजना करणे आवश्यक ठरते. विकार वाढण्यापूर्वी योग्य वेळी वैद्यकिय तपासणी करुन, त्यावर त्वरित उपचार करुन नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. विकारांचे हानीकारक परीणाम टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करता येणे शक्य व्हावे यादृष्टीने काही विशिष्ठ वयोगटातील अधिका-यांना त्यांच्या सोयीच्या ठिकाणी खाजगी रुग्णालयातून ३ वर्षातून एकदा वैद्यकिय तपासणी करुन घेण्याचा व त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावावर विचार करुन, सध्या ही सुविधा राज्यातील ४५ वर्षापेक्षा जास्त वयोगटातील व रु.३७००-५००० व त्यावरील वेतनश्रेणीतील संवर्गामधील अधिका-यांना उपलब्ध करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

२. त्यानुसार या शासन निर्णयान्वये, राज्याच्या शासन सेवेतील ४५ अथवा त्यावरील वयोगटातील व रुपये ३७००-५००० व त्यावरील वेतनश्रेणी संवर्गातील अधिका-यांना त्यांच्या सोयीच्या ठिकाणी खाजगी रुग्णालयातून किंवा वैद्यकिय संस्थांमधून सोबतच्या परिशिष्ठात नमूद केलेल्या वैद्यकिय तपासण्या ३ वर्षातून एकदा करुन घेण्यास व त्यावरील खर्चाची रुपये ३०००/- च्या कमाल मर्यादेत प्रतिपूर्ती करण्यास शासन मंजूरी देत आहे. तथापि वैद्यकिय चाचण्यांवरील खर्चाच्या प्रतिपूर्तीची रुपये ३०००/- ची कमाल मर्यादा कोणत्याही परिस्थितीत शिथिल करण्यांत येणार नाही.

३. उपरोक्त खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देताना, कार्यालय प्रमुख किंवा इतर सक्षम अधिकारी यांनी संबंधित अधिका-याने वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा दावा ३ वर्षातून एकदाच केलेला आहे याची खातरजमा करुन, त्यानुसार प्रमाणित करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, आवश्यक ती नोंद संबंधित अधिका-यांच्या सेवा पुस्तकात घेणे आवश्यक राहील.

४. याबाबतीत आवश्यक ती सुधारणा महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम, १९६१ मध्ये करण्यांत यावी.

यावरील खर्च, संबंधित अधिका-याच्या आस्थापनेवरील वेतन व भत्यासाठी असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक वैप्र ३५४/सेवा-५ दिनांक २४ सप्टेंबर, १९९८ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

AB VI 82 7-1-99 329

(एल.जी.इप्पेवार)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
2 JAN 1999
शाखा ... प्रति

-34- 



शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी-१०९८/ प्र.क्र. २२०/ आरोग्य-३, दिनांक १ डिसेंबर,१९९८ चे सहपत्र.

## "परिशिष्ट"

## The tests carried out under the comprehensive scheme are :-

A) **Blood CBC (Complete Blood Count)**
**Blood Group**
**ESR (Erythrocyte Sedimentation Rate )**
**Fasting Blood Sugar**
**2 Hour Random Blood Sugar**
**Lipid Profile**
**`Total Cholesterol**
**Triglycerides**
**Phospholipids**
**Liver Profile**
**Bilirubin**
**Total Proteins**
**A/G Ratio (Albumin / Globulin)**
**HDL / LDL / VLDL (High Density Lippoproteins / Low Density Lippoproteins / Very Low Density Lippoproteins)**
**CPK (Creatinine Phospho Kinase)**
**Renal Profile**
**SGPT / ALT (Serum Glutamin Trans Phosphote / Alanine Transaminase )**
**SGOT/ AST (Serum Glutamin Oxaloacetic Transaminase/AspailateTransaminase)**
**Alkaline Phosphotase**
**LDH (Lactic Dehydrogenase)**
**Prothrombin Time**
**Australia Antigen (Hepatits - B )**
**Serum Sodium**
**Serum Pottassium**

B) **Urine Routine**
**BUN (Blood Urea Nitrogen )**
**Urea**
**Uric Acid**
**Serum Creatinine**
**Serum Bicarbonates**
**Calcium**
**Phosphorous**

एच- 1099(3000-12-98)2.

C) Stool Routine

D) X-Ray (Chest)

E) ECG / 2 - D Echo / Stress Test

F) Pap Smear for Ladies

G) <u>ADDITIONAL TEST</u>

1) G 6 PD (Glucose Dehydrogase)

2) Acid Phosphatase for Gents / Ladies

3)Audiogram (Ear Test )

4) Spiromatry (Respiratory Capacity)

5) Sonography (Any Mass Cyst Test)

6) Gynaecologist's Consultation

7) Ophthalmologist's Consultation.

----------